पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक १४

**सभावृत्तांत**

दिनांक - १८/१२/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १८/१२/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा. उल्हास शेट्टी
५) मा. प्रसाद शेट्टी
६) मा. काळे विमल रमेश
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणे...मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) महापौर चषक जिल्हास्तर कराटे स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणे...मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणे... मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफीसेस स्पोटर्स असोशिएशन यांना स्पर्धा आयोजनाबाबत आर्थिक पुरस्कार देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणे.... मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव..

----------

अ) दिनांक २०/११/२०१३, २६/११/२०१३, ०४/१२/२०१३ व ०६/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०४/१२/२०१३ व ०६/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १३ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – १
दिनांक – १८/१२/२०१३
सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

विषय - प्रभाग क्र.११ से.नं.२२ राजनगर मधील कै.मधुकर पवळे व्यायामशाळा जयभवानी तरुण मंडळास चालविण्यास देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक – २
दिनांक – १८/१२/२०१३ विभाग – क्रीडा
सूचक – मा. उल्हास शेट्टी अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/९/कावि/४५/२०१३, दि.१९/११/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा खेळाडू दत्तक योजने अंतर्गत सन २०१३-१४ तील पात्र ८३ खेळाडूंसाठी एथलॅटिक्स, नेमबाजी, क्रिकेट, बॉक्सिंग, हॉकी, लॉनटेनिस, बॅडमिंटन इ. खेळाकरीता क्रीडा साहित्य खरेदी व खेळाडू गणवेश, बॅग, स्पाईक व बुट, प्रशिक्षक किट इ. खरेदीकामी र.रु.४३,४०,१८६/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

ठरावाच्या बाजूने – ०६ ठरावाच्या विरोधी - ०१

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक – ३
दिनांक – १८/१२/२०१३
सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा. विमल काळे
संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य कबड्डी असो., पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने व क्रांती क्रीडा मंडळ, पिंपळे सौदागर यांचे सहकार्याने प्रभाग क्र.५५ रहाटणी, पिंपळे सौदागर स.नं.७०, शिवाजी चौक ते काटे वस्ती रोड या ठिकाणी माहे जानेवारी / फेब्रुवारी

२०१४ मध्ये महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३५,३९,६०८/- चे खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.७,९६,०००/- हा स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.२,००,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२५,४३,६०८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७ विषय क्रमांक – ४

दिनांक – १८/१२/२०१३

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा. प्रसाद शेट्टी

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने दि स्पोटर्स कराटे-दो असोशिएशन, पुणे डिस्ट्रिक्ट यांचे मान्यतेने पुणे जिल्हा स्पोर्ट्स कराटे असोशिएशन व युवा आधार संघाचे युवा कराटे ट्रेनिंग सेंटर यांचे सहकार्याने वॉर्ड क्र.१८ किवळे विकासनगर येथील म.न.पा. प्राथमिक शाळेचे मैदान येथे माहे जानेवारी २०१४ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर कराटे स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३,९४,८००/- चे खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.३०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,६४,८००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८ विषय क्रमांक – ५

दिनांक – १८/१२/२०१३

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा. प्रसाद शेट्टी

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा फुटबॉल असोशिएशन व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असो. यांचे मान्यतेने व स्व.राजेश बहल स्पोटर्स एन्ड सोशल फांऊडेशन, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८. यांचे सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी ४११ ०१८ माहे जानेवारी / फेब्रुवारी २०१४ मध्ये महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२९,८५,४२३/- चे खर्चास मान्यता तसेच मैदान तयार करणे, स्टेज मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.१०,६०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.७,५०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.११,७५,४२३/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध

क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ६

दिनांक – १८/१२/२०१३

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा. विमल काळे

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

मा.कार्याध्यक्ष, पुना डिस्ट्रिक्ट इंटर ऑफिसेस स्पोटर्स् असोशिएशन यांनी दि.२५/११/१३ चे पत्रान्वये पुना डिस्ट्रिक्ट इंटर ऑफिसेस स्पोटर्स् असोसिएशन मार्फत सन २०१३-१४ मध्ये घेण्यात येणा-या इंटर ऑफिसेस स्पोटर्स कॉम्पीटिशन करिता ५ खेळांचे स्पर्धांसाठी र.रु.८८,१००/- आर्थिक पुरस्कार देणेकामी कळविले आहे. पुना डिस्ट्रिक्ट इंटर ऑफिसेस स्पोटर्स् असोसिएशन मार्फत सन २०१३-१४ मध्ये घेण्यात येणा-या इंटर ऑफिसेस स्पोटर्स कॉम्पीटिशन करिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून ५ खेळांचे स्पर्धांसाठी र.रु.८८,१००/- आर्थिक पुरस्कार देणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १२०१ /२०१३
दिनांक – १९/१२/२०१३



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.